जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-06/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 21.06.2021

**दिनांक 23.06.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 01** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील नागरीकांना दररोज नियमीतपणे पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीकोणातुन उपाययोजना करणे बाबत.

**सुचक** :- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- नवाब गुरमितसिंघ

**विषय क्रं. 02** **प्रस्ताव**

नांदेड शहरात भिक्षेकरी लोकांची संख्या वरचेवर वाढत आहे. येथील पवित्र गुरुव्दारा साहिब मध्ये लोकांसाठी लंगर महाप्रसाद मिळते त्यावर अशा शेकडो लोकांचा भोजनाचा प्रश्न सुटत असतो व इतर लोकांकडून मिळणारे दान यावर त्यांची गजराण होते.

पण रात्रीला निवा-याची सोय नसल्यामुळे हे लोक मिळेल त्या ठिकाणी रेल्वे स्थानक, बस स्थानक, रस्त्याच्या कडेला, उड्डाण पुला खाली व शटर बंद दुकानापुढे रात्रीचा निवास करीत असतात. पावसाळयात या भिक्षेकरी स्त्री-पुरुषांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. मानवतेच्या दृष्टीकोणातुन मनपाच्यावतीने भिक्षेकरी लोकांसाठी तसेच बाहेर गावाहून रात्री-बेरात्री येणा-या गरीब प्रवाशांसाठी **रात्रीचा निवारा** ही संकल्पना राबवून गरजुंना मदत करावी. मनपाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे हा प्रकल्प सामाजिक संस्था किंवा बीओटी वर दयावा या कामी केंद्र व राज्य सरकार यांचेकडे निधीची मागणी करणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- बापुराव गजभारे **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

केंद्र शासनाच्या धोरणानुसार शहरी भागातील स्लम भागात लोकसंख्येच्या प्रमाणात दर हजारी एक अंगणवाडी असणे आवश्यक आहे परंतु अद्याप पर्यंत सदर धोरणाची पुर्तता करण्यात आलेली नाही. त्यामळे 06 वर्षाखालील मुलांचे शैक्षणिक व सर्वांगीण नुकसान होत आहे.

करिता मनपा हद्यीत शासनाच्या धोरणानुसार स्लम भागात लोकसंख्येच्या प्रमाणात अंगणवाडी सुरु करणे करिता जिल्हा बाल कल्याण विभागा मार्फत प्रस्ताव तयारा करण्यासाठी CDP 1,2,3 कडे पाठविण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान उस्मान खान **अनुमोदक** :- स. शेर अली महेबुब अली

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

मनपा हद्यीतील मुस्लीम दफनभुमी (कब्रस्तान) अंतर्गत विविध मुलभूत सुविधा पुरविणेसाठी निधीची मागणी करिता राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. पुढील वैधानिक कार्यवाही मा आयुक्त यांनी करावी.

**सुचक** :- शबाना बेगम मो. नासेर **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड शहरात अल्पसंख्याक बहुल भागात केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK) अंतर्गत शिक्षण, क्रिडा, शैक्षणिक व आरोग्य संबंधी सुविधा पुरविण्यात येते.

करिता मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 11, 12, 13 व 18 मधील अल्पसंख्यांक भागामध्ये सध्दावना मंडप, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल व इतर मुलभूत सुविधा पुरविणे करिता केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते पुढील वैधानिक कार्यवाही मा. आयुक्त यांनी करावी.

**सुचक** :- स. शेर अली महेबुब अली **अनुमोदक** :- सय्यद शोएब

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 18 मधील शेत सर्वे नं. 33 वजिराबाद येथील वक्फ मालमत्ता ज्याच्यावर वक्फ कार्यालयाचा ताबा आहे. सदरची जागा मुस्लीम समाजाच्या उन्नतीकरिता वापर करण्याकरिता मोकळा भुखंड आहे.

सदरच्या भुखंडवर गेल्या 15-20 वर्षा पासुन ईद च्या नमाज पढण्यासाठी सदरचा वर्षात दोन वेळेस भुखंडाचा उपयोग करण्यात येत आहे. सदर भुखंडा मध्ये धार्मीक कार्यक्रम याअगोदर झालेले आहे. तरी सदर भुखंडामध्ये शासनाच्या अल्पसंख्याक विभागाकडून खालील कामाकरिता निधी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडे पाठविण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

01 वरील मोकळया भुखंडावर नविन ईदगाह तयार करणे.

02 प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अल्पसंख्यांक समाजाच्या नागरीकांना प्लॉट/घर नाही अशा गोर गरीब अल्पसंख्यांक नागरीकांना सदरच्या ठिकाणी घरे बांधुन देणे

03 अल्पसंख्यांक मुले व मुलीसाठी वस्तीगृहाचे बांधून देणे.

04 सदरील भागातील नागरीकांसाठी खेळाचे मैदान विकसीत करणे.

**सुचक**:- अब्दुल फहीम अब्दुल मुनीर **अनुमोदक** :- शोऐब अफाख स. मजहर हुसेन

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 07 मध्ये पापड गल्ली, दधिची नगर व सादतनगर भाग मुलभुत सुविधा पासून वंचित आहे. सध्या पावसाळा सुरु झाल्यामुळे चिखलामुळे लोकांना पायी चालणे अतिशय अवघड झालेले आहे. दोन चाकी, चारचाकी वाहन धारकांना सुध्दा वाहन चालवतांना कसरत करावी लागत आहे. त्यानुसार खालील कामांचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे नागरी दलित्तोत्तर योजनेतुन करण्यासाठी मान्यता घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| 1) | प्रभाग क्रं. 07 मध्ये दधिचीनगर भागात सिमेंट रास्ते करणे | रक्कम रुपये 60.00 लक्ष |
| 2) | प्रभाग क्रं. 07 मध्ये पापड गल्ली भागात सिमेंट रस्ते करणे | रक्कम रुपये 30.00 लक्ष |
| 3) | प्रभाग क्रं. 07 मध्ये सादतनगर भागात सिमेंट रस्ते करणे | रक्कम रुपये 60.00 लक्ष |

**सुचक** :- चव्हाण उमेश अशोकसिंह **अनुमोदक** :- रायबोले ज्योती सुभाष

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत विकासाचे कामे करण्यासाठी नागरी दलित्तोत्तर योजनेतुन करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे खालील कामे शिफारस करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

1- प्र.क्रं. 13 मध्ये मदिनानगर ते पशुवैद्यकिय दवाखाना ागतचा रस्ता खय्युम्म प्लॉट पर्यंत सि.सि. रस्ता करणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी.

2- प्र.क्रं. 14 मध्ये दरबार मसजीद ते होळी नावघार पर्यंत व चौफाळा शिवाजी पुतळा ते तक्या पर्यंतचा रस्ता सि.सि. करणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी.

3- प्र.क्रं. 13 मध्ये पहेलवान टी हाऊस ते चौफाळा पर्यंतचा रस्ता सि.सि. करणे अंदाजे रक्कम रुपये 80.00 लक्ष.

4- प्र.क्रं. 14 मध्ये करबला दवाखाना ते हातजोडी मंदिर ते हसनैन मस्जीद पर्यंतचा सि.सि. रस्ता करणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी.

5- प्र. क्रं. 16 मध्ये जामा मस्जीद ते काला पुल व गौतमनगर ला जोडणारा मोठी ड्रेनेज लाईन टाकणे व गौतमनगर येथील संरक्षण भिंत बांधणे. व आर.सी.सी. नाली व सि.सि. रस्ता व हॉमॅक्स बसविणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी.

6- प्र.क्रं. 17 मध्ये गोवर्धनघाट टेकळी येथील आर.सी.सी. नाली व ड्रेनेज लाईन व पाण्याच्या पाईप लाईन टाकण्याचे कामे करणे अंदाज रक्कम रुपये 01.00 कोटी.

7- प्र. क्रं. 11 मध्ये मिल्लतनगर भागातील हसन मस्जीद, नमक कारखाना पर्यंत रस्ता करणे व गल्ली नं. 01 ते 08 मध्ये आर.सी.सी. नाली, सि.सि. रस्ता व पेवर बसविणे. कोटी. तसेच फेमस पकफंकशन हॉल समोर रस्ता नं. 09 ते श्री अतहर यांचे घरा पर्यंत आर.सी.सी. नाली व पेव्हर बसविणे. अंदाजे रक्कम रु. 01.00 कोटी

8- प्र. क्रं. 12 एकबालनगर येथे श्री सिराज यांचे घर ते मलनिस्सार ट्रीटमेंट प्लॉन्ट पर्यंत व अंतर्गत रस्ते सि.सि. कारणे व आर.सी.सी. नाली करणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी

9- प्र.क्रं. 11 मध्ये बरकतपुरा येथे श्री नईम ते कुरेशी व श्री कलीम ते मंदिना मस्जीद पर्यंत व अंतर्गत रस्ते सि.सि. करणे व आर.सी.सी. नाली करणे अंदाजे रक्कम रुपये 01.00 कोटी.

10- प्र.क्रं. 11 मध्ये मिल्लतनगर रोड ते श्री आसीफ भाई गिरणी पर्यंत त्यालगत अंतर्गत 04 गल्ल्या मध्ये आरसीसी नाली व सिमेंट रस्ता करणे अंदाजे रक्कम रुपये 50.00 लक्ष.

11 प्र.क्रं. 11 मध्ये मिल्लतनगर भागात गल्ली क्रं. 01 ते 16 मध्ये आरसीसी नालीचे काम करणे अंदाजे रक्कम रुपये 50.00 लक्ष.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला **अनुमोदक** :- शबाना बेगम मो.नासेर

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(4) प्रमाणे प्रमोद विश्वासराव गाडगे विरुध्द राज्य सरकार 1997 (4) ऑल. एम. आर. 169 1997 (3) महाराष्ट्र लॉ जनरल 643 या केस मध्ये झालेल्या निर्णयानुसार त्याचाआधार घेवुन महमंद अख्तर पिता शेख महेबुब पुरुष मजुर प्रभारी वसुलीकार बडतर्फ कर्मचारी यांना त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम रुपये 10,69,395/- ही समान हस्त्यात विभागवून त्यांचा कुटूंबाचा उदरनिर्वाह व त्यांच्यावर अवलंबवून असलेल्या वृध्द आई वडील, पत्नी व मुलगा मुली यांच्या दैनंदिन उदनिर्वाह व शिक्षणाचा भागविण्यासाठी त्यांचा दिनांक 01.09.17 ते त्यांना कामावर रुजु करुन घेण्यात येईल त्या दिनांका पर्यंतचा कालावधी असाधारण रजा म्हणून मान्य करुन मानवतीच्या दृष्टीकोणातुन शेवटची संधी म्हणून त्यांना सेवेत करुन घेण्यास ही सभा सर्वानुमते समंत करते.

**सुचक** :- अब्दुल शमीम अब्दुल्ला **अनुमोदक** :- अ. हफीज अ. करीम, शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक वेतन/1119/प्र.क्र.03/2019/सेवा-03 दिनांक 02 मार्च 2019 च्या शासन निर्णयानुसार शासनाने 7व्या वेतन आयोगामध्ये तीन लाभाचा सुधारीत सेवाअंतर्गत आश्वाशीत प्रगती योजनेच्या अनुज्ञेयते बाबत निर्णय दिला आहे. त्यानुसार 7व्या वेतन आयोगाच्या कार्यकाळा मध्ये 10-20-30 वर्षाच्या नियमीत सेवेनंतरची तिन लाभाची सुधारीत सेवाअंतर्गत आश्वाशीत प्रगत योजना लागु करण्या बाबत कळविले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-3 साठी नियुक्ती प्राधिकारी मा. आयुक्त हे अधिनियमातील तरतुदीनुसार आहेत. त्यामुळे यापुर्वी तत्कालीन आयुक्त यांनी त्यांचे आदेश क्रमांक नावाशमनपा/आस्था-1/6051/12 दिनांक 18.10.2012 च्या आदेशाव्दारे शासन निर्णयातील तरतुदी व संबंधीत कर्मचा-यांची सेवापडताळणी करुन वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यापुर्वी मुख्यलेखा परिक्षक मनपा नांदेड यांचे मार्फत वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यात यावी असे आदेश निर्गमीत केले आहे.

याच धर्तीवर उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार पहिला, दुसरा व तिसरा लाभ देण्यासाठी प्रकरणी मुख्यलेखा परिक्षक व मुख्यलेखाधिकारी यांचे कडून पडताळणी करुन लागु करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवही करावी.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

कक्ष अधिकारी नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई-32 यांनी यांचे पत्र क्रं नामपा-2019/प्र.क्र348 /नवि24 दिं 23.12.2020 च्या पत्राव्दारे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी कर्मचा-यांना दिं 01 जानेवारी 2016 पासुन सातवा वेतन आयोग लागु करण्यास व प्रत्यक्ष वेतन देण्यास दिं 01 डिसेंबर 2020 पासुन देण्यास मान्यता दिली आहे.

सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन आदेश क्रं साप्रवि/आस्था-1/12657/2021 दिं 15.03.2021 च्या आदेशाव्दारे शासनाच्या वित्त विभागाकडील महापालिकेत प्रती नियुक्तीवरील असलेले मुख्य लेखा परिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली वेतन निश्चीतीसाठी समिती गठीत करण्यात आली यामध्ये शासनाच्या वित्त विभागाकडील या महानगरपालिकेत प्रति नियुक्तीवर असलेले मुख्य लेखाधिकारी, लेखाधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

सर्वप्रथम नांदेड वाघाळा महानगरपालिकेत शासनमान्य मंजुर पदाचे वर्गीकरण केले नसल्याने उप.आयुक्त पासुन लिपीक पदापर्यंत सर्व पदे तांत्रिक व अतांत्रिक संवर्गात वर्ग 3 मध्येच अंतर्भुत असल्याची बाब समितीने विचारात घेतलेली नाही.

सदर समितीने दिं 07.04.2021 रोजी सादर केलेला अहवाल मोघम स्वरुपाचा असुन त्यामुळे वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ लिपीक व अग्निशमन अस्थापनेवरील कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचा-यांना वेतनिश्चीतीच्या लाभापासुन वंचीत ठेवले आहे.

अस्थापनेवर शासनमान्य असलेली पदे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 76 (2) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 51 (4) नुसार अर्हता पदसंख्या व वेतनश्रेणी सह शासनाने मान्यता दिली आहे या पद मान्यतेच्या आदेशात शासनाने जि वेतनेश्रेणी शासनमान्य केली आहे त्या वेतनश्रेणी समकक्ष वेळोवेळी सुधारित चौथा वेतन आयोग, पाचवा वेतन आयोग व सहावा वेतन आयोग यामध्ये समकक्ष सुधारित वेतनश्रेणी शासनाने मान्य केली असुन या नुसार वेळोवेळी वेतनाची अदाई झालेली आहे याबाबत वेळोवेळी महालेखाकार, नागपुर व स्थानिक लेखा परिक्षण यांचे कडुन झालेल्या लेखा परिक्षणाच्या वेळी कोणताही आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही हया बाबत समितीने विचारात घेतलेली नाही.

वरिष्ठ लिपीकांच्या बाबतीत वरिष्ठ लिपीक पदास वेतनश्रेणी रु 5000-8000 लागु करण्या संदर्भात सन 2013 मध्ये नियुक्ती गठित केलेल्या समितीने दिलेल्या अहवालावरुन शासनाने वरिष्ठ लिपीक या अभिनामाच्या पदास वेतनश्रेणी रु 5000-8000 दिं 13.08.2015 च्या शासन निर्णयाव्दारे दिलेली शासन मान्यता व या मान्यतेनुसार सन 2015 पासुन झालेली वेतन अदाई या बाबत वेळोवेळी झालेल्या लेखा परिक्षणात कोणताही आक्षेप नसल्याची बाबत समितीने विचारात घेतलेली नाही.

शिवाय याप्रमाणे कालबध्द पदोन्नतीस पहिल्या लाभासाठी नियमानुसार पात्र ठरलेल्या लिपीकांना वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 लागु करुन वेतन अदाई होत असल्याची बाबत समितीने विचारात घेतलेली नाही.

राज्य शासनाने सातव्या वेतन आयोगमध्ये सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग तसेच नाशिक महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत या ठिकाणी वरिष्ठ लिपीक या पदास वेतनश्रेणी रु 9300-34800 ग्रेड पे - 4300 या वेतनश्रेणी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी मान्य केली आहे ही बाब समितीने विचारात घेतलेली नाही.

सामान्य प्रशासन विभगाच्या 08 जुन 1995 व वित्त विभागाच्या दिं 01 एप्रील 2010 च्या शासन निर्णयानुसार लिपीक संवर्गात कालबध्द पदोन्नतीस पात्र ठरलेल्या लिपीकांन अर्हतकारी 12 वर्षाची सेवा झाल्यानंतर पहिल लाभ वेतनश्रेणी 4000-6000 व 24 वर्षाची अर्हतकारी सेवा झाल्यानंतर वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे - 4300 नियमानुसार लागु केलेली असताना व या वेतनश्रेणीत वेतन अदाई होत असताना या कर्मचा-यांच्या सातव्या वेतन आयोगमध्ये समकक्ष वेतनश्रेणी मध्ये वेतननिश्चीती करण्याबाबत कोणतेही ठोस मत न दिल्यामुळे या कर्मचा-यांना जाणीवपुर्वक वेतन निश्चीतीच्या लाभापासुन वंचीत ठेवण्यात आले यासाठी समितीने कोणतेही मत व्यक्त केलेले नसल्यामुळे यासाठी समिती जबाबदार ठरत आहे.

वरील सर्व बाबीची फेर तपासणी करुन सुधारित अहवाल देण्यास समितीस निर्देश देवुन संबंधीतांना तात्काळ वेतननिश्चीतीचा लाभ देण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- बापुराव गजभारे

**विषय क्रं.** 12 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळाशहर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी तसेच प्रतिनियुक्ती शासकीय अधिकारी यांचे मुळ पद, त्यांना देण्यात आलेले पद व महापालिका आस्थापनेवर किती पदे रिकत आहे याबाबतची सविस्तर तपशीवालर माहिती देणे बाबत.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान

**अनुमोदक** :- अ. सत्तार अ. गफुर, अ. शमीम अब्दुल्ला, अ. रशीद अ. गणी, शोऐब अफाक मजहर हुसेन, शबाना बेगम मो. नोसर, अ. फहीम अ. मुनीर, अ. गफार अ. सत्तार, शमीम बेगम शेख जावीद.

**विषय क्रं.** 13 **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची वजिराबाद येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये इयत्ता 01ली ते 08वी पर्यंतचे वर्ग कार्यान्वीत असून हया शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे संख्या मोठी आहे येथे शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी हे गोरगरीब कुटूंबातील असल्याने इयत्ता 8वी नंतर पुढील शिक्षण घेण्याकरिता येथील विद्यार्थ्यांनामोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे मनपा शाळा वजिराबाद येथे इयत्ता 8वी पुढील इयत्ता 9वी व 10वी चे वर्ग सुरु करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. कांताबाई प्रकाशचंद मुथा **अनुमोदक** :- श्रीमती प्रभाबाई यादव

**स्वाक्षरीत/-**

**( स. अजीतपालसिंघ संधू )**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**